# १३ . संततिसौख्य (पंचमस्थान)

- पंचमस्थानावरून संततिसुखाचा विचार केला जातो . या स्थानात असलेले ग्रह , या स्थानाचा स्वामी व स्थानावरील इतर ग्रहांची दृष्टी ही सर्व शुभ असतील व लग्नेश – पंचमेश यांचे शुभयोग ( युति अगर नवपंचमयोग ) असतील तर संततिसुख उत्तम मिळेल . ह्या स्थानाशी कशाही प्रकारे गुरूचा संबंध असेल तर संततियोग अवश्य येतो .

- शनि , मंगळ व राहू यांचा या पंचमस्थानाशी संबंध येत असेल तर संततीसंबंधी अनिष्ट फळे मिळतात . शनिचा संबंध असेल तर संतति उशिरा होते . मंगळाचा संबंध असेल तर झालेली सर्वचसंतति टिकत नाही व राहूचा संबंध असेल तर कित्येकदा गर्भनाश होतो .

- पंचमस्थान , पंचमेश व लग्नेश यांचेशी पुरूषग्रहांचा ( रवि , मंगळ , गुरू ) संबंध येत असेल तर पुत्रसंतति होईल व स्त्रीग्रहांचा ( चंद्र व शुक्र ) संबंध येत असेल तर कन्या होतील .
  पंचमस्थानात पुरूषराशि ( १ . ३ . ५ . ७ . ९ . ११) असेल तर पुत्रसंतति व स्त्रीराशि ( २ . ४ . ६ . ८ . १० . १२)असेल कन्यासंतति होईल .

<u>अपत्यजन्मामध्ये पती आणि पत्नी यांचा एकत्रित सहभाग आवश्यक असल्याने पंचमस्थान , पंचमेश , गुरू यांचा उभय पत्रिकेतील अभ्यास संततियोगाच्या अभ्यासासाठी आवश्यक असतो .</u>

संततीयोगाचा अभ्यास खालील उपप्रकारांमध्ये विभागून केल्यास ते अधिक सोयीचे होईल .

- संततीप्राप्ती
- खडतर संततीयोग
- वंध्यादोष व वीर्यदोष
- निःसंतान योग
- अपंग संतती
- अपत्यांचे वारंवार मृत्यू
- पुत्र व कन्या संतति
- संततिसंबंधीचे काही योग
- पंचमस्थानातील ग्रह व त्यांची फळे .

## <u>संततीप्राप्ती :</u> ( पंचमस्थान )

१ . पंचमातून गोचरीच्या गुरूचे भ्रमण चंद्रास त्रिक नसल्यास म्हणजेच मूळ पत्रिकेत चंद्र षष्टात , दशमात किंवा व्ययात नसल्यास .

ⓧ म्हणजे चंद्र




२ . पंचमेशावरून गोचरीच्या गुरूचे भ्रमण , चंद्रास त्रिक नसल्यास .

३ . गोचरीच्या गुरूची पंचमावर दृष्टी असता म्हणजेच गोचरीचा गुरू लग्नी , भाग्यात किंवा लाभात असता त्याची ५ . ७ . ९ वी दृष्टी पंचमावर असते .

४. गुरू महादशेमध्ये गुरू अंतर्दशा असता.

५. स्त्री पत्रिकेत कर्क ( ४ ) धनु ( ९ ) मीन ( १२ ) वृश्चिक ( ८ ) राशीतील गुरू व विवाहोत्तर लगेच गुरूची महादशा असल्यास.

६. मूळच्या चंद्राला गोचरीचा गुरू पाचवा अगर सातवा असून तो त्रिकस्थानातून ( ६. ८. १२ ) जात नसेल तर संततीयोग संभवतो.

७. मूळच्या गुरूवरून गोचरीच्या गुरूचे भ्रमण ६. ८. १२ मधून होत नसेल तर.

८. गोचरीने एकटा बुध एकादशात किंवा गोचरीने एकटा शुक्र पंचमात आला असता आणि पंचमस्थान व पंचमेश दूषित नसल्यास.

<u>खडतर संततीयोग :</u>

१. पंचमस्थानामध्ये मकरेचा शनि, राहू ने दूषित ( योग किंवा दृष्टी )







२. पंचमस्थानामध्ये राहू अगर केतू ( अपवाद मिथुन राहू वा धनुराशीतील केतू ) असल्यास सर्पदोषांमुळे संतती होण्यास अडथळे येतात.

३. स्त्री पत्रिकेत सप्तमात शनि, राहू अगर शनि हर्षल युती असल्यास मूल गर्भाशयामध्ये सातव्या किंवा आठव्या महिन्यामध्ये मृत्यू पावण्याची शक्यता असते. असाच प्रकार पुरूष पत्रिकेत अष्टमात रवि चंद्र युतीत असता होऊ शकतो.

४. पंचमेश, विशेषत्वे शनि, व्ययामध्ये ( १२ व्या स्थानी ) असून विवाहोत्तर शनिची महादशा असल्यास गर्भधारणा होणे कठिण असते.

५. मकरेचा गुरू अगर अस्तंगत गुरू, विशेषतः त्रिकस्थानी असल्यास.

६. पंचमामध्ये कुंभेचा ( ११ ) रवि असल्यास.

७. स्त्री कुंडलीमध्ये पंचमात अग्नि राशीतील ( १. ५. ९ ) मधील युवा मंगळ ( १२° - १८° ) असल्यास वारंवार गर्भपात संभवतात.

## वंध्यादोष व वीर्यदोष ः

१. पंचमस्थानातील राहू किंवा केतू , विशेषतः धनु (९) मीन (१२) राशीतील राहू किंवा मिथुन (३) कन्या (६) राशीतील केतू.

२. पुरूष पत्रिकेत जलराशीतील (४.८.१२) विशेषतः मीनेमध्ये मंगळ त्रिकस्थानी. त्यातही षष्टात असल्यास.

३. स्त्री कुंडलीत पंचमात कन्येचा (६) शुक्र असल्यास ( अगर गोचरीने आल्यास ) अंडविसर्जन क्रियेमध्ये अडथळा येतो. अशा शुक्रावर पापग्रहांची दृष्टी असल्यास हा दोष प्रकर्षाने प्रकट होतो. अशा शुक्राच्या सहवासात मंगळ असल्यास अधिक रक्तस्त्रावाचा विकार संभवतो.

४. एखाद्या जोडप्याच्या लग्नी , पंचमात वा सप्तमात अशुभ स्थितीमधील पापग्रह असल्यास **Incompatibility** मुळे गर्भसंभव होत नाही.

५. स्त्रीच्या पत्रिकेमध्ये पंचमस्थानी वा पंचमेश दोषार्ह ग्रह असून लग्नी अगर सप्तमात राहू / केतू / शनि / मंगळ असल्यास अगर दृष्टी असल्यास जननेंद्रियाची पूर्ण वाढ झाली नसण्याची शक्यता अधिक प्रमाणात असते व त्यामुळे वंध्यत्व संभवते.

६. पंचमामध्ये वंध्याराशि असून (१. ३. ५. ६ रास ) पत्रिकेमध्ये गुरू शनि युतियोग असता व्यंधत्व संभवते.

७. स्त्री कुंडलीमध्ये तुळ (७) राशीमध्ये राहू असता गरोदरपणात नजर लागणे संभवते.

८. तूळेचा शनि असता गर्भाशयात दोष असल्याने गर्भसंभवात अडथळे येतात.

९. पुरूषाच्या शुक्रजंतू तयार होण्याच्या प्रक्रियेस व स्त्रीच्या बीजाशयातून बीजांड बाहेर पडण्याच्या मासिक प्रक्रियेस पंचम किंवा अष्टमातील रवि किंवा मंगळ किंवा प्लूटो अडथळा आणतात व त्यामुळे रजोदोष / वीर्यदोष संभवतो.

१०. तूळेत मंगळ असल्यास आर्तवदोषामुळे गर्भसंभवात अडथळे येतात.

## निःसंतान योग ः

१. गुरू हर्षल युती पंचमस्थानी व शनिची दृष्टी. म्हणजेच शनि तृतीय , अष्टम किंवा लाभात असल्यास त्याची ३. ७. १० वी दृष्टी पंचमावर असते.




२. गुरू राहूची युति कोठल्याही स्थानी व पंचमात हर्षल किंवा शनि असल्यास.

३ . मकरेचा ( १० ) गुरूवर राहू अगर केतूचा कुयोग .

४ . मेषेचा ( १) शनि पंचमात व विवाहोत्तर काळात त्याची महादशा असल्यास .

५ . पुरूषपत्रिकेत ३ किंवा ६ व्या स्थानी बुध असून १० किंवा ११ स्थानी शनि असल्यास नपुंसकत्व संभवते .

६ . चतुर्थामध्ये ३ किंवा ४ पापग्रह सहवासयोगात असल्यासही असाच परिणाम संभवतो .

७ . स्त्री कुंडलीत सप्तमात शनि बुध युतियोगात असल्यास तिचा पती जननक्षम नसण्याचा संभव अधिक असतो .

८ . गुरू - राहू , गुरू - मंगळ अष्टमात , निपुत्रिकपणा दर्शवितात .

## अपंग संतती योग ः

१ . पंचमेश अष्टमात असून पत्रिकेत कोठेही धनुराशीमध्ये गुरू व राहू यांची युति असल्यास .

२ . पंचमामध्ये शनि , राहू व गुरू यांची युति असून पंचमेशाची पापग्रहाशी युति असल्यास .

३ . पंचमेशाचा अगर पंचमस्थानातील ग्रहांचा अथवा गुरूचा राहूशी दारूण कुयोग असून विवाहोत्तर राहूची महादशा असल्यासही अपंग संतती संभवते . ( अपवाद मिथुनेचा राहू )

## अपत्यांचे वारंवार मृत्युयोग ः

१ . पंचमेश त्रिकस्थानी , विशेषतः व्ययात .

२ . रवि व शनि हे अंशात्मक प्रतियोगात असून विवाहोत्तर काळात शनिची महादशा असल्यास .

३ . चंद्रावर शनिकडून दारूण कुयोग असल्यास .

४ . गुरू , मंगळाची अंशात्मक युती .

## पुत्र वा कन्या संतती ः

१ . पंचमस्थान , पंचमेश व लग्नेश यांच्याशी पुरूष ग्रहांचा ( रवि , मंगळ , गुरू ) संबंध येत असेल तर पुत्रसंतति होईल व स्त्री ग्रहांचा ( चंद्र व शुक्र) संबंध येत असेल तर कन्या संतती होईल .

२ . पंचमस्थानी पुरूषराशि (१ . ३ . ५ . ७ . ९ . ११) असेल तर पुत्रसंतति व स्त्रीराशि (२ . ४ . ६ . ८ . १० . १२) असेल तर कन्यासंतति होईल .

३ . पंचमेश चंद्राच्या नवांशात असेल तर स्त्री संतती जास्त होते . पंचमेश मंगळाच्या नवांशात असेल तर पुरूष संतंती जास्त होते .

४. आधान लग्नाचा नवांश विषम राशीचा असेल अथवा आधान लग्नाच्या नवांश राशीस पुरूष ग्रह असतील तर पुरूषसंतती संभवते अन्यथा कन्या संतती संभवते.

५. आधान लग्न रवि , चंद्र व गुरू विषम राशीस विषम नवांशी असताना पुत्रप्राप्ती संभवते व समराशी समनवांशी असता कन्यासंतती संभवते. आधान लग्नी चंद्र पापग्रहयुक्त अथवा दृष्ट असता अपंगसंतती संभवते.

६. आधान लग्नाचा नवांशाधिपती वक्री असता प्रसुतीस त्रास होतो.

७. गुरू - राहू , गुरू - मंगळ अष्टमात - कन्यासंतति होते.

<u>संततिसंबंधीचे योग ः</u>

१. पंचमात राहू , पंचमेश पापग्रहाबरोबर युतित आणि गुरू निर्बली / नीचीचा <u>किंवा</u> पापग्रह गुरूपासून व लग्नापासून पंचमात. फलित ः ३२ व ४० वर्षी संततीस धोका.

२. पंचमात गुरू व पंचमेशाबरोबर शुक्र <u>किंवा</u> गुरू भाग्यात , शुक्र पंचमात लग्नेशाबरोबर. फलित ः ३२ , ३३ , ४० वर्षी पुत्रजन्म होतो.

३. पंचमेश गुरू आणि रवि बलवान.
फलित ः कर्तृत्ववान मुलगा.

४. पंचमेश केंद्रात किंवा त्रिकोणात.
फलित ः एकच मुलगा.

५. पंचमेश त्रिकस्थानी.
फलित ः अपत्ययोग नाही. संततीसुखात अडचणी.

६. मंगळ व शनि पंचमात , लग्नेश बुधाच्या राशित , बुधाबरोबर किंवा बुधाची दृष्टी किंवा सप्तमेश लाभात , पंचमेश शुभग्रहाबरोबर आणि पंचमात शनि किंवा मंगळ.
फलित ः मुलगा दत्तक घेतला जाईल.

७. पंचमस्थानी राहू , शनि सोडून अन्य ग्रहांच्या नवमांशात.
फलित ः पुष्कळ संतति.

८. गुरू , लग्नेश , सप्तमेश , पंचमेश निर्बली किंवा नीच राशीस
फलित ः अपत्ययोग नाही.

९. एकच ग्रह लग्नेश व चतुर्थेश किंवा लग्नेश , चतुर्थेश मित्रग्रह किंवा शुभग्राहांची द्दष्टी
फलित ः आई व मुलांत प्रेम व सलोख्याचे संबंध.

१०. लग्नेश व चतुर्थेश बुध पापग्रहाबरोबर किंवा द्दष्टीत.
फलित ः आईचा द्वेष करतील. हा योग मिथुन लग्न असल्यासच शक्य आहे.

११ . मूळ गुरू गोचर शुक्राशी नवपंचम करतो तेव्हा संतती होते .

१२ . पंचमस्थानावर शनि , राहूची दृष्टी असता कन्या अधिक होतात व दत्तकविधानाचा योग होतो .

१३ . पंचमस्थानी कुंभेचा रवि अपत्यहीनता दर्शवितो .

१४ . पंचमात ह + मं , मं + के , मं + रा , श + मं युति असता मृतसंतति संभवते .

१५ . गुरू + मंगळ युती पंचमात संतती जगू देत नाही .

१६ . पंचमात मिथुनेचा मंगळ असता १ ले अपत्य मृत संभवते .

१७ . पंचमस्थानी वायुराशीत ( ३ . ७ . ११ ) चंद्र असता पुत्रसंतति होत नाही .

१८ . स्त्री कुंडलीत लग्नेश अष्टमात व पंचमेश त्रिकस्थानी किंवा पंचमेश व अष्टमेशाचा अन्योन्ययोग असता प्रसूतिस त्रास संभवतो .

<u>ग्रहांची संततिविषयक फले ः</u>

रवि ः पंचमात - प्रथम पुत्र झाल्यास जगत नाही . पंचमात हर्षलयुक्त - संततीस अपघात . संततीशी भांडणे . जलराशीत , सिंहराशीत गुरूयुक्त - संतती जास्त .

चंद्र पंचमात ः चांगले सौख्य देतो . प्रथम कन्या योग .

मंगळ पंचमात ः संततीच्या दृष्टीने अपायकारक , प्रसूतीस्त्रास , गर्भपात . संततीशी पटत नाही . मुले स्वतंत्र वृत्तीची .
हर्षल , शनि . नेपच्यून युक्त - अत्यंत वाईट . पुत्रशोक , पुत्रचिंता .
मंगळ - राहू - संततीस शारीरीक वैगुण्य देतो .

बुध ः पंचमात - एकटा संतती कमी .
बुध शनि - संतती नाही .

गुरू <u>पंचमात</u> - शनियुक्त - उशिरा संतती , निपुत्रिकपणा .
गुरू मंगळ - आर्थिक बाबतीत मुलांशी पटत नाही .
गुरू राहू / केतू - मुकी बहिरी व्यंग संतती .
नवमस्थानात पापग्रह असता - संतती शोक .
मकरेचा गुरू - संतती सुखरहित .

अष्टमात गुरू - राहू , गुरू - मंगळ - फक्त कन्यासंतति वा निपुत्रिकपणा . अष्टमात पापग्रहयुक्त - संततीस वाईट .

शुक्र पंचमात - संतती चांगली व हुशार कन्यासंतती जास्त .
अष्टमात - संतती चांगली नसते .
भाग्यात - तृतीय संतती कन्या . संततीपासून सुख .

शनि पंचमात - उशीरा संतती देतो . दोन संततीत अंतर . पापग्रहाबरोबर - संतती नाही .

हर्षल पंचमात - गर्भपात , गर्भाशय विकृति , प्रसूति त्रासकारक , ऑपरेशननंतर जन्म .

राहू - पंचमात . व्यंगपूर्ण संतती . संतती होत नाही .

केतू पंचमात ः संतती होत नाही . पीडादायक संतती .